# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ)(१)ब(१) आदेश

जा.क्र.उपनि/वसई/बी.१/न्युनिा हौ./कं.७७(अ)/१३५८ /२०१७
उपनिबंधक सहकारी संस्था वसई तालुका यांचे कार्यालय
तामतलाव, जॉनी क्रॉस गल्ली, ता. वसई, जि. पालघर
दिनांक :- १६/११/२०१७

वाचावे :-१.श्री.अनिल रामकृष्ण कस्तुरी (पै) यांचा दि.०९/०२/२०१६ रोजीचा अर्ज.
२.या कार्यालयाकडील दि.१६/०३/२०१६ रोजीचे पत्र
३.श्री.सी.एस.पाटील यांचा दि.२९/०९/२०१६ रोजीचा अहवाल.
४. या कार्यालयाकडील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये दिनांक ११/१०/२०१७ रोजीची कारणे दाखवा नोटीस.
५.महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ)मधील तरतुद.

ज्याअर्थी न्यु विणा को-ऑप. हौ. सोसा. लि. विर सावरकर नगर,वसई रोड (प.), ता. वसई , जि. पालघर ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनूसार नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्था असून ती या कार्यालयाच्या अखत्यारित येत आहे आणि,

ज्याअर्थी वाचावे क्र. १ नूसार संस्थेचे श्री.अनिल रामकृष्ण कस्तुरी (पै) यांनी केलेल्या तक्रारीस अनुसरुन वाचावे क्रं.२ नूसार संस्थेच्या तपासणीसाठी श्री.सी.एस.पाटील सहकारी अधिकारी (प्रथम श्रेणी) यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यानूसार तपासणी अधिकारी यांनी संस्थेच्या दप्तराची तपासणी घेवून तपासणी अहवाल या कार्यालयास दि.२९/०९/२०१६ रोजी सादर केलेला आहे. तपासणी अहवालात संस्थेच्या नोंदणीपासुन वार्षिक सर्वसाधारण सभा झालेल्या नाही.संस्थेचे कामकाज ठप्प असुन कार्यरत पदाधिकारी केवळ सभासदांकडुन मासिक देखभाल शुल्काचे देयक वसुल करतात.संस्थेची व्यवस्थापक समिती अल्पमतात असुन तसेच तिची मुदत संपुष्टात आल्याने संस्थेचे कामकाज ठप्प झालेले आहे इ.दोष आढळुन आलेले आहेत असे नमुद केले होते आणि

ज्याअर्थी वार्षिक सर्वसाधारण सभा झालेल्या नाही व व्यवस्थापक समितीची मुदत संपुन देखील संस्थेची निवडणुक घेण्यात आलेली नाही. तसेच संस्थेची विद्यमान व्यवस्थापक समिती अल्पमतात आल्याने समितीची सभा घेण्यासाठी कोरम होत नसल्यामूळे व्यवस्थापनामध्ये पोकळी निर्माण झालेली आहे व संस्थेचे कामकाज ठप्प झालेले आहे असे सकृतदर्शने स्पष्ट होते व त्यामुळे संस्थेची व्यवस्थापक समिती बरखास्त का करु नये याबाबत संस्थेस वाचले क्रमांक ४ अन्वये कारणे दाखवा नोटीस संस्थेस बजावून या कार्यालयात दिनांक २७/१०/२०१७ रोजी सुनावणी आयोजित करण्यांत आलेली होती आणि

ज्याअर्थी, दिनांक २७/१०/२०१७ रोजीच्या सुनावणीत संस्थेने त्यांचे लेखी म्हणने सादर केलेले आहे.सदर लेखी म्हणण्याचे अवलोकन केले असता संस्थेने सन २००८ ते २०१७ या कालावधीचे लेखापरिक्षण पूर्ण करुन तसा अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे.तक्रारदार श्री.अनिल कस्तुरी (पै) हे संस्थेचे सभासद नाहीत. संस्थेचे संचालक मंडळ संस्थेवर २००८ पासून कार्यरत आहे.व्यवस्थापक समितीवर फक्त दोन सदस्य कार्यरत आहेत.असे मुद्दे नमूद केल्याचे दिसून येत आहे. आणि

त्याअर्थी संस्थेकडील लेखी म्हण्ण्याचे अवलोकन केले असता संस्थेवर कार्यरत समिती हि सन २००८ पासून कार्यरत असल्याने संस्था समितीची मुदत संपुष्टात आलेली आहे संस्थेवर सद्यस्थितीत कायदेशिर समिती कार्यरत नसल्याचे दिसून येत आहे.त्यामुळे न्यु विना को.ऑप.हौसिंग सोसा.लि. विर सावरकर नगर,वसई

Scanned by CamScanner

रोड (प.), ता. वसई , जि. पालघर या संस्थेवर अधिकृत समिती कार्यरत नसल्याची माझी खात्री झाली आहे. सबब संस्थेचे दैनंदिन कामकाज पाहण्याकरिता प्राधिकृत अधिका-याची नेमणूक करणे आवश्यक असल्याने खालिलप्रमाणे आदेश पारित करण्यांत येत आहे.

## :- आदेश -:

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ (अ)(१)ब(१) अन्वये प्राप्त अधिकारानूसार मी, डॉ.अशोक कुंभार , उप निबंधक, सहकारी संस्था,वसई , न्यु विना को.ऑप.हौसिंग सोसा.लि. विर सावरकर नगर,वसई रोड (प.), ता. वसई , जि. पालघर या संस्थेची व्यवस्थापक बरखास्त करून त्याठिकाणी श्री.रॉकी घोन्सालवीस,तामतलाव,वसई यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करीत आहे.

प्राधिकृत अधिकारी यांनी संस्थेच्या दप्तराचा व मालमत्तेचा व दावायोग्य कागदपत्रांचा संपूर्ण पदभार घेवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.तसेच संस्था संचालक मंडळाचे निवडणूकीचे अनुषंगाने सभासदांची यादी विहित नमुन्यात तयार करुन या कार्यालयास सादर करावी.

प्रस्तुत आदेश आज दि. १६/११/२०१७ रोजी माझे सही व शासन मुद्रेसह दिला असे.

( डॉ.अशोक कुंभार )
उपनिबंधक,
सहकारी संस्था, वसई.

प्रति,

१. श्री.रॉकी घोन्सालवीस,तामतलाव,वसई तथा प्राधिकृत अधिकारी न्यु विना को.ऑप.हौसिंग सोसा.लि. विर सावरकर नगर,वसई रोड (प.), ता. वसई , जि. पालघर

२.अध्यक्ष/सचिव, न्यु विना को.ऑप.हौसिंग सोसा.लि. विर सावरकर नगर,वसई रोड (प.), ता. वसई , जि. पालघर

२/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी संस्थेच्या दप्तराचा ,मालमत्तेचा व दावायोग्य कागदपत्रांचा संपूर्ण ताबा प्राधिकृत अधिकारी यांना देवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३. शाखा व्यवस्थापक,ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. शाखा- वसई रोड

Scanned by CamScanner